# नवी मुंबई महानगरपालिका

**आरोग्य विभाग**

**जाहिरात क्र.002/2020, जा.क्र.नमुंमपा/आरोग्य/4763/2020, दि. 05/06/2020**

**कोव्हीड-19 प्रतिबंध अंतर्गत कंत्राटी (करार) पध्दतीने वैद्यकीय /निम्म वैदयकीय मनुष्यबळाच्या सेवा घेणेबाबत.**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना विषाणू (कोव्हीड - 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी पात्र इच्छूक उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधनावर कंत्राटी (करार) पध्दतीने सेवा घेणेबाबत दिनांक 10/06/2020 ते दि. 20/06/2020 या कालावधीत थेट मुलाखती (Walk in interview) आयोजित करण्यात आल्या आहेत.

| अ. क्र. | संवर्ग | शैक्षणिक अर्हता | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | **कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी** | | | |
| | **एम.बी.बी.एस.** | 1.मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी<br>2. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (M.M.C.)/ मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (M.C.I.) कडील नोंदणी आवश्यक आहे. | **60** | **65000/-** |
| | **बी.डी.एस.** | 1.मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.डी.एस. (दंतशल्य चिकित्सा) पदवी<br>2.महाराष्ट्र डेंटल कौन्सिल यांचेकडील नोंदणी आवश्यक आहे. | **60** | **60000/-** |
| | **बी.ए.एम.एस.** | 1.मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस. पदवी<br>2. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (M.C.I.M.)/सेंन्ट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (C.C.I.M.) कडील नोंदणी आवश्यक आहे. | **60** | **55000/-** |
| | **बी.एच.एम.एस.** | 1.मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस.पदवी<br>2. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी (M.C.H) कडील नोंदणी आवश्यक आहे. | **60** | **50000/-** |
| 2 | **स्टाफ नर्स** | 1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी ची विज्ञान शाखेतील परिक्षा उत्तीर्ण.<br>महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलची जनरल नर्सिग व मिडवाईफरी या विषयाची पदवीका किंवा बी. एस्सी. नर्सीग<br>2. महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक आहे. | **100** | **30000/-** |
| 3 | **ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ (ANM)** | 1.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.<br>2.शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ (ANM) अभ्यासक्रम पूर्ण.<br>3.महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक. | **150** | **25000/-** |
| 4 | **बेड साईड सहाय्यक** | Certificate in Bedside Assistant - One Year Course | **50** | **20000/-** |
| 5 | **नर्सिग सहाय्यक** | Nursing Assistant - One Year Course<br>Diploma in Medical Nursing Assistant (CMNA)<br>Or<br>General Duty Assistant (DGDA) | **50** | **20000/-** |

**अटी व शर्ती :-**

1. वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय दिनांक 31/05/2020 रोजी 50 वर्षापेक्षा जास्त नसावे.
2. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा आणि त्याने याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
3. उपरोक्त पदाकरिंता सेवा देणेचा हा 3 महिने किंवा कोरोना (कोव्हीड-19) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल.
4. उमेदवार सद्यस्थितीत शासकीय/खाजगी सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी संबधित कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) सादर करणे आवश्यक राहील.
5. निवड झालेल्या उमेदवाराने कामावर हजर होणेपूर्वी विहित केलेल्या नमुन्यातील घोषणापत्र महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहील.
6. उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. कागदपत्रांच्या प्राथमिक छाननी नंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.
7. उमेदवारांची जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची स्व-साक्षांकित (self attested) प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची स्व-साक्षांकित (self attested) प्रत जोडणे आवश्यक राहील.
8. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.
9. उमेदवाराचे नाव बदलले असेल तर नाव बदलासाठी उमेदवाराने विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्रातील प्रत सादर करावी. उमेदवार मूळ नावाने (Maiden Name) देखील अर्ज करू शकतात.
10. जाहिरातमधील विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या स्व-साक्षांकित (self attested) प्रती नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.
11. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
12. नियुक्त उमेदवारांना कोव्हिड-19 संबंधित सर्व कर्तव्य पार पाडावे लागेल.
13. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने खोटी कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास, गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबाबतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्याची उमेदवारी रद्द केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची सदर सेवा समाप्त करण्यात येईल.
14. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
15. **उमेदवारास सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने त्यासंदर्भात 30 दिवसांची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.**
16. **ही सदर सेवा नियुक्ती केवळ साथरोगाच्या कालावधीसाठी** संपुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावरील कंत्राटी (करार) पध्दतीने असल्याने उमेदवारास कायमस्वरूपी नियुक्ती मागणीचा हक्क असणार नाही.

**विशेष सूचना :-**

1. यापूर्वी सादर केलेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
2. कोणताही अर्ज पोस्टाद्वारे / टपालाद्वारे स्वीकारले जाणार नाही.
3. उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी मूळ अंतिम वर्षाची गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रासह इतर सर्व आवश्यक प्रमाणपत्रे व त्यांच्या स्व-साक्षांकित (self attested) झेरॉक्स प्रती, स्वत:चे पासपोर्ट आकाराच्या फोटोसह उपस्थित रहावे.
4. उमेदवाराने कामाच्या अनुभवाची मूळ प्रमाणपत्रे त्यांच्या स्व-साक्षांकित (self attested) झेरॉक्स प्रतीसह उपस्थित रहावे.
5. **मुलाखतीचे ठिकाणः** नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ज्ञानकेंद्र, तिसरा मजला, प्लॉट क्रमांक 1/2, पाम बीच रोड, सेक्टर - 15 ए , सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, 400 614
6. उमेदवारांच्या थेट मुलाखती ह्या दिनांक 10 जून 2020 ते 20 जून 2020 दरम्यान सर्व कामाच्या दिवशी (सार्वजनिक सुट्टी वगळता) घेण्यात येतील. सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 या वेळेत उमेदवारांची नोंदणी आणि मूळ कागदपत्रे छाननी व तपासणी करण्यात येईल आणि सायंकाळी 3.00 ते 5.00 या वेळेत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**उमेदवारांची निवड पध्दत :-**

कोव्हीड-19 या साथरोगाची उद्भवलेली असाधारण परिस्थिती लक्षात घेता याचा प्रादूर्भाव रोखण्याकरीता तातडीची उपायोजना करणे आवश्यक असल्याने, उमेदवारांची निवड ही प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (First come first serve basis) या तत्वावर केली जाईल. जर प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या ही जाहिरातीमधील आवश्यक मनुष्यबळाची संख्या जास्त असल्यास उमेदवारांची निवड नमूद शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

सही /-

**(अण्णासाहेब मिसाळ)**

**प्रशासक व आयुक्त,**